# कथा-५

## <-: दहा मोहरांचा दृष्टात -:>

जवा ते ह्या गोष्टी आयकून रायले होते,तवा त्यानं हा दृष्टात सांगतला,कारण कि तो यरुशलेमाचा जवळ होता,अन् त्यांयलें असं वाटे कि देवाचं राज्य आताचं प्रगट होणार हाय.यामुळे तो म्हणाला,एक धनवान माणूस दूरच्या देशात गेला,ह्यासाठी कि राज्यासन मिळुन परत यावे म्हणून.तवा त्यानं आपल्या दहा दासांना बलावून त्यांयलें दहा मोहरे देली,अन् त्यांयलें म्हणलं म्या येई परंत या वर लेन-देन करजाक.परंतु त्याच्या नगरातले लोकं त्याचा राग[व्देष] करत,अन् त्याच्यावाल्या मांग वकिलांना पाठवून सांगतले,कि आमाले ह्याचं राज्य पायजे नाई असी आमची इच्छा हाय.जवा तो राज्यासन मिळुन वापस आला,तवा असं झालं,कि त्यानं आपल्या दासांनाज्यांयलेंत्यानं पयसा देला होता,त्यांयलें आपल्या पासी बलावलं ह्यासाठी कि त्यांयच्यातून प्रत्येकान व्यापारातून काय काय कमावलं हाय.तवा पयल्या येऊन म्हणलं,हे स्वामी तुह्यावाल्या ज्या मोहरे घेतल्या होत्या त्याच्या पासून दहा मोहरे कमावल्या हायत.तवा स्वामी ने त्यालें म्हणलं,शाबास तू धन्य हायस दास, तू धन्य हाय,तू अगदी लायण्या गोष्टीविषयी विश्वास योग्य झालास म्हणून तू आता दहा नगरांचा अधिकारी हो.मंग दुसऱ्यानं येऊन म्हणलं,हे स्वामी, तुह्या मोहरे पासून पांच अजुक मोहरे कमावल्या हाय.तवा स्वामी ने म्हणलें,तू पण पांच नगरावर अधिकारी हो.मंग तिसऱ्यानं येऊन म्हणलं,हे स्वामी, पाहा,तुह्यावाली देलेली मोहर हे हाय जे म्या,माह्याल्या रुमालात बांधून ठेवली होती.कावून कि म्या तुले भेत होतो, कारण तू कठोर माणूस हायसं,जे तू ठेवलं नाई ते उचलून घेतो,अन् जे तू पेरलं नाई त्याची कटाई करतो.तवा स्वामी नं म्हणलं,हे दृष्ट दास,म्या तुह्यावाल्या तोंडानं तुले दोषी ठरवतो,तु मले ओळखलं होतं कि म्या कठोर माणूस हाय,जे म्या नाई ठेवलं, ते उचलून घेतो,अन् जे म्या नाई पेरलं त्याची कटाई करतो हे तुले ठाऊक होतं काय.तर त्या माह्याल्या पयसा पेटीत का नाई ठेवला,कि माह्याल्या येण्याच्या वाक्ती म्या व्याजा सगट वसूल केला असता.?अन् जे लोकं जवळ उभें होते,तवा त्यानं त्यांयलें म्हणलं,ते मोहर त्याच्यावाल्या पासून घेऊन घ्या अन् ज्याच्या पासी दहा मोहरे हायत त्यालें घ्या.तवा त्यांयनं त्यालें म्हणलं,हेस्वामी,त्याच्या पासी दहा मोहरे हायत.म्या तुमाले सांगतो,कि ज्याच्या पासी हाय,त्यालें देल्या जाईन ,अन् ज्याच्या पासी नाई,त्याच्या पासून ते पण त्याच्या पासी हाय वापस घेतलं जाईन.परंतु माह्याल्या त्या विरोधीयांना ज्यांयलें वाटत जाय कि म्या त्यांयच्या वर राज्य नाई करावं,त्यायच्या अती माह्याला समोर मारून टाका .